कृषि यांत्रीकीकरण उपअभियान २०१६-१७
**मार्गदर्शक सुचना - सुधारणा**
ईमेल - ddaqc5@rediffmail.com.

जा.क्र.कृ यां.उ.अ./गुनि-५/मा.सू.१६-१७/सुधा./ 202 /२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
दि. 3 /०६/२०१६.

**प्रति,**

**१) जिल्हाधिकारी ---------------------------------- (सर्व)**
**२) विभागीय कृषि सहसंचालक --------------------(सर्व)**
**३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी --------------- (सर्व)**

**विषय- सन २०१६-१७ मध्ये कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा विशेष संयंत्रे/उपकरणांचा समावेश मार्गदर्शक सुचनांमध्ये करण्याबाबत...**

**संदर्भ :** १) शासन पत्र क्र. कृयाउ-२०१४/प्र.क्र.१२४/४अे, दि. १७/१०/२०१४
२) कृषि आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र.कृ यां.उ.अ./गुनि-५/मा.सू.१६-१७/२९८/२०१६, दि.२७/०६/२०१६.
३) केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र. No.3-4/2014-M&T(I&P) Pt, दि.१४/०७/२०१६.

सन २०१६-१७ मध्ये राज्यात राबविण्यात येणा-या कृषि यांत्रीकीकरण उपअभियानाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना संदर्भिय पत्र दि. २७/०६/२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आल्या असून त्या कृषि विभागाच्या संकेतस्थळावर (http://www.mahaagri.gov.in) उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

१) केंद्र शासनाचे संदर्भिय पत्र दि. १४/०७/२०१६ अन्वये सदर उपअभियानाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांतील **घटक क्र. ३ मध्ये काही विशेष संयंत्रे/उपकरणांचा समावेश केलेला आहे**. सदर उपकरणांचा समावेश आयुक्तालयाच्या संदर्भिय **मार्गदर्शक सुचनांतील प्रपत्र -१** मध्ये करण्यात येत आहे. सदर उपकरणे/संयंत्राचा तपशील व अनुज्ञेय अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**घटक नं ३ - कृषि औजारे/मशिनरी/उपकरणे यांचे खरेदिसाठी अर्थसहाय्याचा दर**

| अ.न. | कृषि औजाराचा प्रकार | अ.जा., अ.ज., अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी व महिला लाभार्थीसाठी | | इतर लाभार्थीसाठी | |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर कमाल अनुदान मर्यादा प्रती औजार/उपकरण प्रती लाभार्थी | अनुदानाची टक्केवारी | मंजुर कमाल अनुदान मर्यादा प्रती औजार/उपकरण प्रती लाभार्थी | अनुदानाची टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सौर उर्जा चलीत/ विजेवर चालणारे प्राणी निवारक बायोअकॉस्टीक उपकरण (सौर पॅनल सह ) | **रु. ०.२५ लाख** | **५० टक्के** | **रु. ०.२० लाख** | **४० टक्के** |
| २ | सौर उर्जा चलीत / विजेवर चालणारे प्राणी निवारक बायोअकॉस्टीक उपकरण (सौर पॅनल विना ) | **रु. ०.१९ लाख** | **५० टक्के** | **रु. ०.१५ लाख** | **४० टक्के** |
| ३ | रोपवाटीकेमध्ये पीकांची वाढ करण्याकरिता सौर उर्जा चलीत / विजेवर चालणारे हायड्रोपॉनिक्स यंत्रे | **रु. ०.६३ लाख** | **५० टक्के** | **रु. ०.५० लाख** | **४० टक्के** |

२) संदर्भिय शासन पत्र दि. १७/१०/२०१४ अन्वये सुचित केल्यानुसार घटक ३ - 'कृषि औजारांचा अनुदानावर पुरवठा' बाबत संदर्भिय दि.२७/०६/२०१६ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार वितरीत जिल्हानिहाय भौतीक व आर्थिक

लक्षांकाच्या अनुषंगाने जिल्ह्यांतर्गत प्राप्त पात्र अर्जदारांनुसार उपविभागांतर्गत /तालुकांतर्गत लक्षांकात काही बदल करणे क्रमप्राप्त असल्यास असे बदल करण्याचे अधिकार सबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना राहतील. सदर बदल जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावेत. तथापि, सदर बदल प्रवर्गनिहाय मंजुर आर्थिक तरतुदीच्या मर्यादेतच करणे बंधनकारक राहील याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त नमुद सुधारणांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

(कृ. वि. देशमुख)
**कृषि संचालक (नि. व गु. नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत - माहीतीस्तव सविनय सादर -**

१. मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन), मंत्रालय, मुंबई-३२.
२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादीत, दिनकरराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.